महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २२१ वा | दिनांक : २८/०६/२०२५ | वार : शनिवार

## हिंदी सक्तीच्या जीआरची होळी करा : उद्धव ठाकरे



**मुंबई :** उद्धव ठाकरे यांनी हिंदी सक्तीच्या सरकारच्या निर्णयाला कडाडून विरोध केला आहे. अशातच आता हिंदी सक्ती विरोधात प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात आंदोलन करा आणि हिंदी सक्तीच्या जीआरची होळी करा, असे आदेश उद्धव ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना दिले आहेत. दुसरीकडे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हिंदी सक्तीच्या विरोधात ५ जुलै रोजी मुंबईत मोर्चा काढणार आहेत. "ना कुठला झेंडा, फक्त मराठीचा अजेंडा" असा नारा देत दोन्ही बंधूंनी मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. त्यात आता शरद पवारांच्या राष्ट्रवादीनेही पहिली ते चौथी हिंदी नको अशी भूमिका घेत या मोर्चात सहभागी होण्याचा निर्णय जाहीर केला आहे. याबाबत पक्षाच्या वतीने एक निवेदन जारी करण्यात आले आहे.

उद्धव ठाकरे यांनी आज जिल्हाप्रमुखांशी ऑनलाईनद्वारे संवाद साधला. यावेळी उद्धव ठाकरेंनी राज्यभरात आंदोलन करण्याचे आदेश दिले आहेत. रविवारी दुपारी ३ वाजता हिंदी सक्ती विरोधात प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात आंदोलन करत शालेय शिक्षण विभागाकडून काढण्यात आलेल्या हिंदी सक्तीच्या जीआरची होळी करा, असे उद्धव ठाकरेंनी जिल्हाप्रमुखांना सांगितले.

महाराष्ट्र सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 याअंतर्गत त्रिभाषा सूत्राच समीकरण पुढे करत इयत्ता पहिलीपासून शालेय अभ्यासक्रमात हिंदी भाषा बंधनकारक करण्याचे योजिले आहे. याविरोधात महाराष्ट्रात मराठी भाषिकांमध्ये टोकाचं जनमत तयार होत आहे. अनेक विद्यार्थी, पालक, शिक्षणतज्ञ, भाषातज्ञ अशा सर्व मान्यवरांनी त्रिभाषा सूत्र इयत्ता पहिलीपासून राबविण्यास विविध आक्षेप नोंदविले आहेत. पण कुणालाही न जुमानता राज्य सरकार 'हिंदी सक्ती' साठी हट्ट धरून बसलं आहे.

खरं तर, महाराष्ट्राच्या जनमानसाचा कानोसा घेतलात तर जाणवतं कि, कुणाचाही विविध भाषा शिकण्याला किंबहुना हिंदी भाषेलाही विरोध नाही, पण इयत्ता पहिलीपासूनचं प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतून व्हावं असा आग्रह आहे, जो योग्य आहे आणि 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार' पक्ष म्हणून आमचीही हीच भूमिका आहे. शैक्षणिक धोरणाच्या त्रिभाषा सूत्राआडून मातृभाषेला डावलण्यासाठी प्रयत्न होत असतील तर मराठी माणूस एकदिलाने त्याचा विरोध करणार, ह्याची सत्ताधाऱ्यांनी नोंद घ्यावी.

तेव्हा महाराष्ट्र सरकारच्या 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ' अंतर्गत त्रिभाषा सूत्रान्वये केल्या जाणाऱ्या हिंदी सक्तीला विरोध करण्यासाठी येत्या शनिवार, दि. 5 जुलै 2025 रोजी तमाम मराठीजनांकडून मुंबईत एक मोर्चा पुकारण्यात आला आहे.

'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार' पक्षाचा या मोर्चाला संपूर्ण पाठिंबा आहे. महाराष्ट्र हिताचा प्रश्न उभा राहतो तेव्हा महाराष्ट्रासाठी आणि जेव्हा राष्ट्रहिताचा प्रश्न उभा राहतो तेव्हा राष्ट्रासाठी पक्षीय भेदाभेद बाजूला सारून उभं राहणं हेच' राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार' पक्षाचं स्पष्ट धोरण आहे. म्हणूनच, मी पक्षाच्या सर्व लोकप्रतिनिधींना, पदाधिकारी व कार्यकर्त्यांना आवाहन करत आहे की, येत्या 5 जुलैच्या मोर्चात प्रचंड संख्येने आवर्जून सहभागी व्हा! असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने जारी केलेल्या निवेदनात करण्यात आले आहे.

दरम्यान, महापालिका निवडणुकीसाठी भाजप २४ तास फक्त राजकारण करत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला. हिंदी सक्ती गुजरात, तामिळनाडू, बंगाल, ओडिसा या कुठल्याही राज्यात केली नाही परंतु महाराष्ट्रात केली जात आहे. कुठली भाषा शिकायची हा इच्छेचा प्रयत्न आहे. सक्तीचा नाही, असेही ते म्हणालेत. मला फ्रेंच शिकायचे असेल ते शिकेन, जर्मन शिकेन पण तुम्ही सक्ती का करता? असा सवालही जितेंद्र आव्हाड यांनी केला.

मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंत्री काय बोलत नाही. बैठकीबाहेर सक्ती नको बोलतात, मग बैठकीत मूग गिळून गप्प बसता का? तुमच्या समोर विषय येतात. त्यात चर्चा होते, मंत्रिमंडळाचा निर्णय जाहीर होतो. त्यानंतर वाद झाल्यानंतर तुम्हाला १०-१५ दिवसांनी जाग येते. हिंमत असेल तर मुख्यमंत्र्यांना पत्र लिहा. हिंदी सक्तीला आमचा विरोध आहे सांगा. मराठी माणसांना वेडे समजता का...? अशी टीका जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे.

## मराठीसाठी ५ जुलैचा मोर्चा ठरणार 'सोनियाचा दिन'



**छत्रपती संभाजीनगर :** राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे ५ तारखेच्या मोर्च्यात एकत्र येणार असून ते सोनियाचा दिवस असणार आहे. मराठीसाठी सर्व जण एकत्र आले हे दृश्य ज्यावेळेस जगाला दिसेल त्यावेळेस बऱ्याच जणांना त्रास होईल, असे मनसेचे प्रकाश महाजन यांनी म्हटले आहे.

प्रकाश महाजन म्हणाले की, ठाकरे बंधू जर एकत्र मोर्चा काढत असतील तर चांगली गोष्ट आहे, ५ तारखेला याची प्रचिती येईल. असे झाल तर तो मराठी भाषेसाठी सुदिन असेल. मराठीसाठी जो आमच्या मोर्चात मराठी म्हणून येणार आहे त्या प्रत्येकाचे आम्ही स्वागत करतो.

प्रकाश महाजन म्हणाले की, मनसे-उबाठाच्या युतीबद्दल मी भाष्य करणार नाही. पण मराठीसाठी जर सगळे एकत्र आले तर खूप चांगले आहे. बाकी युती हा भविष्याचा मुद्दा त्याचा आपण आज काय भविष्य सांगावे जे आहे ते मराठीसाठी एकत्र यावे. ५ तारखेचा मोर्चा हा केवळ मराठीसाठी असणार आहे. यात काहीही राजकीय अजेंडा नाही. मराठी टिकली तर महाराष्ट्र टिकेल अन् महाराष्ट्र टिकला तर राष्ट्र टिकेल हे ज्यांना समजले आहे ते सर्व लोकं मोर्चासाठी येतील. त्यांचे आम्ही स्वागत करु.

प्रकाश महाजन म्हणाले की, मराठी माणूस मराठीसाठी एक आहे हे दृश्य जेव्हा मोर्चातून दिसेल तेव्हा सरकारला विचार करावा लागेल. राज-उद्धव ठाकरेंच्या एकत्र मोर्चानंतर राज्यातील मराठी माणूस रस्त्यावर स्वाभिमानाने चालताना दिसेल. त्यांच्यावर कुणीही कसली जबरदस्ती करु शकणार नाही. प्रत्येक मराठी माणसाला आपण सुरक्षित आहोत ही भावना येईल.ती येणं गरजेचे आहे.

प्रकाश महाजन म्हणाले की, भाषेच्या प्रश्नावर का होईना, हे दोघे बंधू एकत्र आलेत.आज मला बाळासाहेब ठाकरे आणि माँसाहेबांची आठवण आली. त्यांना किती आनंद झाला असेल.मी स्वतः खूप उत्सुक आहे की, ती ५ जुलैची तारीख कधी येतेय आणि मी सगळं पाहतोय.

## संदीपान भुमरे हे आमच्यातून गेलेले गद्दार पक्षाचे नेते - अंबादास दानवे

**छत्रपती संभाजीनगर :** खासदार संदीपान भुमरे यांच्या ड्रायव्हरला हैदराबादच्या एका कुटुंबाने तब्बल १५० कोटींची जमीन भेट म्हणून दिल्याची धक्कादायक बाब पुढे आली आहे. या प्रकरणी परभणीच्या एका वकिलाने तक्रार नोंदवल्यानंतर पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने या प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे. यावर शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी संदीपान भुमरे यांच्यावर जोरदार टीका केली आहे.

अंबादास दानवे म्हणाले, संदीपान भुमरे हे आमच्यातून गेलेले गद्दार पक्षाचे नेते आहेत. खासदार आहेत. आम्ही बघितले की एक साधा ड्रायव्हर ज्याला पाच-पंचवीस हजार रुपये पगार असेल. या ड्रायव्हरला सालार जंग अशा पद्धतीने एवढी प्रॉपर्टी गिफ्ट देत असेल आणि तेही भुमरेंच्याच ड्रायव्हरला आणि सालार जंग संभाजीनगरमध्ये फिरत असतात. सत्तेच्या बळावर ती प्रॉपर्टी ताब्यात घेण्याचा प्रकार या संभाजीनगरात घडलेला आहे.

पुढे बोलताना अंबादास दानवे म्हणाले, हा सालार जंग कोण आहे आणि हा कोण ड्रायव्हर आहे जो दीडशे कोटींची प्रॉपर्टी खरेदी करतो. याचा आता जनतेने विचार करायला पाहिजे. ही लूटच आहे. मागे संजय शिरसाट यांचे प्रकरण बाहेर आले होते आता हे भुमरेंचे प्रकरण बाहेर आले आहे. जनतेने विचार करावा.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २८ जून २०२५


# मुकुल मंदिर मध्ये गुणवंत यशवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न







**छत्रपती संभाजीनगर :** परिपाठामध्ये शालांत प्रमाणपत्र परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष कमांडर श्री अनिल सावे सर मुख्याध्यापक श्री जयंत चौधरी सर श्री सुरेश परदेशी सर, श्रीमती मेधा भगाडे, गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक श्री काळे श्री व सौ .नागरे, श्री व सौ भोरटक्के सर्व शिक्षक वृंद विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात सुंदर अशा 'मानवाने माणसाशी 'या प्रार्थनेने करण्यात आली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री जयंत चौधरी सरांनी केले. एसएससी बोर्ड मध्ये मुकुल मंदिर मधून प्रथम आलेला चिरंजीव गणेश भोरटक्के ९८:६०%, शाळेतून मुलींमधून प्रथम आलेले कुमारी तनिष्का नागरे ९६:६०% तसेच एनडीए मध्ये निवड झालेला मुकुल मंदिर चा माजी विद्यार्थी चिरंजीव पार्थ काळे यांचे संस्थेचे अध्यक्ष कमांडर अनिल सावे यांच्या हस्ते भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले.

सोबत त्यांच्या आई-वडिलांचे ही सत्कार करण्यात आले या तीनही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत अगदी समर्पक पणे मांडले त्यातून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन तर मिळालेच परंतु भावी आयुष्याची वाटचाल कशी करावी यासाठी ही मार्गदर्शक सूचना मिळाल्या. पालकांनी त्यांच्या पाल्याला मिळालेले मार्गदर्शनाबद्दल आभार व्यक्त करत मनोगत व्यक्त केले. शाळेसाठी भेटवस्तू म्हणून श्री नागरे सरांनी वाचनालयासाठी पुस्तकाच्या स्वरूपात भेट दिली.

यानंतर अध्यक्ष समारोप कमांडर श्री अनिल सावे सरांनी तिघांचे कौतुक करत विद्यार्थ्यांना त्याच पद्धतीने आपणही आपला जीवन प्रवास ध्यानुरूप निवडावा असे आव्हान करत केला. तसेच या तीनही विद्यार्थ्यां बद्दल अभिमान असल्याबाबत आपले मनोगत व्यक्त केले तसेच चांगला निकाल लागल्याबद्दल सर्व शिक्षकांचे कौतुक केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता दहावी मधील विद्यार्थ्यांनी समृद्धी गरड अस्मिता पारवेकर आणि आभार वैष्णवी व रुद्रा यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी दहावीच्या वर्ग शिक्षकांनी व सर्व शिक्षकांनी हातभार लावला.

# डॉ. रामलिंग पुराणे यांना श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा गुणीजन गौरव पुरस्कार जाहीर



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील सामाजिक कार्यकर्ते तथा बसव प्रतिष्ठान अखिल भारतीय सामाजिक संघटनेचे अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे यांना त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ अक्कलकोट संस्थाच्या वतीने त्यांना "गुणीजन गौरव" पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.श्री स्वामी समर्थ महाराजांच्या कृपाशीर्वादाने गुरुपौर्णिमा १९८८ पासून श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, एफ/२२७९ अक्कलकोट हे धर्मादाय न्यास कार्यरत आहे. येथे परगावच्या स्वामी भक्तांना दैनंदिन अन्नदानाचे महाप्रसाद देण्याचे स्वामीकार्य गेली ३७ वर्ष करीत आहे. श्री गुरुपौर्णिमा व न्यासाच्या वर्धापन दिनानिमित्त धर्मसंकिर्तन व सांस्कृतिक कार्यक्रम गेल्या २६ वर्षापासून संपन्न होत असून यावर्षीचा कालावधी दि.३० जुन २०२५ ते ९ जुलै २०२५ पर्यंत आहे.श्री गुरुपौर्णिमा व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३८ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून दि. ७/०७/२०२५ सोमवार रोजी सायं ६:३० वा. अन्नछत्र मंडळाच्या प्रांगणात आपल्या उत्कृष्ट कार्याबद्दल 'गुणीजन गौरव' पुरस्काराने सन्मानीत करण्यात येणार असल्याचे पत्र डॉ. रामलिंग पुराणे यांना मंडळाच्या वतीने पाठवण्यात आले आहे. या पुरस्कारासाठी डॉ. पुराणे यांच्या सामाजिक कार्याबद्दल वर्गमित्र खंडेराव व्हडले यांनी मंडळाकडे शिफारस केली होती.

# सरी...

टप टप करत
सरी बरसल्या,
इकडे तिकडे
अश्या पसरल्या...

खळखळ खळखळ
पाणी वाहे,
कागदाची होडी
अलगद वाहे...

छत्री घेवून
मुले निघाली,
शाळेची सुट्टी
पावसात बुडाली...

रप रप करत
सरी परतली,
गोड आठवण
देवून परतली...

ऋषीकेश कारभारी आव्हाळे
(कविराज रीष)
मो. +९१ ९४०४० ००३९८






# फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची शतकोत्तर ११५ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

**छत्रपती संभाजीनगर :** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय, ४, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर येथे "देशात संसदीय लोकशाहीची पद्धत यशस्वी करायची असेल तर सरकार व जनता उभयतांनी घटनेतील काही संकेत आणि नीति यांचे पालन करणे आवश्यक आहे." या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ऐतिहासिक विधानाच्या ७५ व्या वर्धापनदिनानिमित्त सदरील विषयावर ११५ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहीक कार्यशाळा १५ जून २०२५ ला संपन्न झाली. फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे समन्वयक एड. विलास रामटेके अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, लोकशाही राज्यात जनता व सरकार या उभयतांनी देशाच्या संविधानाची पायमल्ली होणार नाही याची जाणीव ठेवून नीतिमत्ता पाळली पाहिजे. चांगला कारभार करण्यासाठीच जनतेने प्रतिनिधी मार्फत सरकारला अधिकार दिलेले असतात. आपल्या कर्तव्याची पूर्तता होऊ शकत नाही याची जाणीव झाल्यावर त्यांनी आपल्या अधिकार पदाचा त्याग केला पाहिजे. लोकशाहीची अंमलबजावणी करीत असताना समाजातील विषमता नष्ट केली पाहिजे. कायदा व प्रशासन हे समतेच्या स्थापनेसाठी वापर करताना विरोधी पक्षांचे म्हणणे विचारार्थ घेऊन निर्णय घेतले पाहिजेत. जेणेकरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे रक्ताचा एक थेंबही सांडू न देता लोकांच्या सामाजिक व आर्थिक जीवनात आमुलाग्र बदल घडवून आणता येईल. उद्घाटनपर मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्त्या सविता अभ्यंकर म्हणाल्या की, समाजातील दोन टक्के लोक समाजकार्य करतात. त्यातील ही बहुतांश लोक मान सन्मानासाठीच कार्य करतात. बहुतांश कार्यक्रमात ४५ च्या वरील वयोगटातील व्यक्ती उपस्थित असतात. तर मग युवकांना बाबासाहेब कधी कळणार? प्रत्येक विहारात अशा प्रबोधनात्मक कार्यशाळा आयोजित करण्याची नितांत आवश्यकता आहे. स्त्री पुरुष समानता नसल्याने समाजाची प्रगती होत नाही. म्हणून महिलांचा सहभाग वाढविला पाहिजे. प्रमुख वक्ते एड. डी. व्ही. खिल्लारे म्हणाले की, या देशातील सर्व नागरिकांना सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रात समानतापूर्वक न्याय देण्यासाठी भारताचे संविधानात आश्वासित करण्यात आले आहे. करिता लोकशाहीच्या अंमलबजावणी साठी भारताचे संविधान हे एक साधन आहे. ज्यात नागरिकांची प्रतिष्ठा जपली पाहिजे. प्रत्येक नागरिकांने विषमतेविरुद्ध लढताना आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून भूमिका पार पाडली पाहिजे. याप्रसंगी सम्यक रामटेके म्हणाले की, एकत्रित येऊन विचारांची देवाणघेवाण केल्याने ज्ञान वाढत असते. प्रतिक पंचशील म्हणाले की, वकील मंडळींनी पुढाकार घेऊन समाजाला भारताचे संविधान समजावून सांगितले पाहिजे. रामदास अभ्यंकर म्हणाले की, आपले नेते सामाजिक बांधिलकी पाळत नसल्याने दुरावस्था होत आहे. साधू आनंद म्हणाले की, तथागत बुद्ध, सम्राट अशोक व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीचा पाया सत्यात उतरविला आहे. अशोक मेश्राम म्हणाले की, संसदेत जनतेच्या हितासाठी कार्य झाले पाहिजे. करिता सक्षम प्रतिनिधी सभागृहात पाठविले पाहिजे. डी. बी. मेश्राम म्हणाले की, प्रबोधनात्मक कार्यशाळेचे महत्त्व पटवून देण्यासाठी आपण लोकांकडे सुद्धा गेले पाहिजे. एड. राजू बागूल म्हणाले की, भारताचे संविधान सर्वोच्च आहे. करिता आपण आपले हक्क अधिकार जाणून घेऊन कायदेशीर बाबीसह समस्या सरकार कडे मांडल्या पाहिजेत. प्रास्ताविक करताना उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले की, जनतेने कायद्याचे पालन केले तर भारताचे संविधानाची पायमल्ली करणा-यांवर वचक बसेल. सामाजिक प्रबोधनासाठी अशा कार्यशाळांची गरज आहे. सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर स्टडी सर्कलच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. कार्यशाळेचे सुत्रसंचालन महादेव डांबरे तर आभार डी. बी. मेश्राम यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यशाळेला महादेव डांबरे, एड. विलास रामटेके, प्रतिक पंचशील, उद्योजक मिलिंद बागूल, डी. बी. मेश्राम, सम्यक रामटेके, अशोक मेश्राम, एड. राजू बागूल, एड. डी. व्ही. खिल्लारे, सविता अभ्यंकर, रामदास अभ्यंकर, साधू आनंद इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २८ जून २०२५


## सामाजिक समता व आरक्षणाचे प्रणेते राजर्षी शाहूमहाराज - प्रा. एन .एम. करडे




**छत्रपती संभाजीनगर** : "महाराष्ट्राने सर्वच बाबतीत देशाला दिशा देण्याचे कार्य केले आहे . राष्ट्रीय चळवळी असो की समाज सुधारणा महाराष्ट्रानेच नेतृत्व केले आहे.सामाजिक समता व आरक्षणाचे प्रणेते म्हणून असे क्रांतिकार्य राजर्षी शाहूमहाराज यांनीच केले ".असे प्रतिपादन प्रा.एन .एम .करडे यांनी केले . डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात झालेल्या राजर्षी शाहूमहाराज यांच्या जयंती कार्यक्रमानिमित्त प्रा. एन. एम. करडे यांनी शाहूमहाराजांच्या मुलगामी तसेच आधुनिक सामाजिक जडणघडणीतील योगदान अधोरेखित केले. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. के. खिल्लारे हे होते. त्यांनी आजच्या विद्यार्थ्यांनी राजर्षी शाहूमहाराज यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन राष्ट्र उभारणीत योगदान द्यावे असे आवाहन केले. यावेळी डॉ.एस. पी. खिल्लारे, डॉ. बी.एन. शिंदे, डॉ. एस. पी. बुधवंत, डॉ. सतीश वाघमारे, अधिक्षक श्री राजू पट्टेकर यांची उपस्थिती होती .सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संतोष कुंडेटकर, शेख शब्बीर, रामा धबदुले यांनी परिश्रम घेतले . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नवनाथ गोरे यांनी तर आभार डॉ. गणेश खिल्लारे यांनी व्यक्त केले .

## प्रतिभाताई पाटील प्राथमिक शाळा व वत्सलाबाई पाटील माध्यमिक शाळेत राजर्षी शाहू महाराज जयंती साजरा



**छत्रपती संभाजीनगर** : प्रतिभाताई पाटील प्राथमिक शाळा व वत्सलाबाई पाटील माध्यमिक शाळेत राजर्षी शाहू महाराज जयंती चा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री शैलेंद्र पाटील सर व प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक ढमाले सर उपस्थित होते तसेच शाळेचे ज्येष्ठ शिक्षक श्री कोलते सर तसेच ज्येष्ठ शिक्षिका सानप मॅडम याही उपस्थित होत्या शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांची भाषणे झाली अशाप्रकारे उत्साहात जयंती साजरी करण्यात आली

## श्री. ऋषिकेश सिंगारेड्डी यांच्या पथकाने कुंटनखाण्यावर छापा मारुन ०५ पिडीत महिलांची केली सुटका



**दौलताबाद (जावेद अहमद)** : मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१ श्री. ऋषिकेश सिंगारेड्डी यांना गोपनिय माहीती मिळाली की, निसर्ग हॉटेलच्या पाठीमागे करोडी छत्रपती संभाजीनगर येथे काही महिलांना डाबुन ठेवुन त्यांच्याकडुन वेश्यव्यवसाय करवुन घेतला जात असल्याची माहीती मिळाल्यावरुन सदर माहीतीची खात्री करुन पथकास सुचना देवुन सदर ठिकाणी पोलीस निरीक्षक प्रविणा यादव नेमणुक पोलीस ठाणे वेदांतनगर यांच्या अधिपत्याखाली बनावट ग्राहक पाठवुन छापा मारला असता १) कृष्णा प्रकाश चव्हाण, वय-२४ वर्ष, धंदा हॉटेल, रा. गट नं ९ ग्रँड सरोवर हॉटेलच्या बाजुला तिसगांव ता.जि. छत्रपती संभाजीनगर २) रवि काशिनाथ पौळ, वय-३८ वर्ष, धंदा हॉटेल चालक रा. जामा मजिद जवळ पौळ रांजणगांव ता. जि. छत्रपती संभाजीनगर ३) किशोर सुखलाल गणराज, वय-३० वर्ष धंदा हॉटेल चालक रा. पंढरपुर फुले नगर एम.आय.डी.सी वाळूज ४) कमलेश एकनाथ भालेराव, वय २३ वर्ष, धंदा मॅनेजर रा. गल्ली नं ३ आंबेडकर नगर तिसगांव ता.जि.छत्रपती संभाजीनगर ५) संजय मानसिंग जाधव, वय-४१ वर्ष, धंदा सफाई कामगार रा. हिरापुरी ता. गेवराई जि.बिड यांचे ताब्यात ०५ पिडीत महीला आढळुन आल्यात त्यांची नमुद ०५ आरोपीतांकडुन सुटका करुन ०१ लाख ५९ हजार २२० रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन पोअ धर्मराज गायकवाड यांच्या फिर्यादीवरुन पो.स्टे. दौलताबाद येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरची कार्यवाही मा. पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर प्रविण पवार, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, छत्रपती संभाजीनगर ऋषिकेश सिंगारेड्डी यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक प्रविणा यादव, पोउपनि वैभव मोरे, सफौ / शशिकांत सोनवणे, पोह/ भास्कर गायकवाड, देविदास गडवे, धर्मराज गायकवाड, सुरेश भिसे, पोअ जयदिप आढे, शिवाजी होडशिळ मपोह वर्षा मुढे, मनिषा दाभाडे, सोनाली म्हस्के छत्रपती संभाजीनगर यांनी केली.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २८ जून २०२५


## संभाजीनगरात लवकरच मोठी गुंतवणूक : मंत्री मंगल प्रभात लोढा

**छत्रपती संभाजीनगर** :जिल्ह्यात नजिकच्या काळात उद्योग क्षेत्रात मोठी गुंतवणूक होत आहे. या औद्योगिक क्षेत्राला कुशल मनुष्यबळाची आवश्यकता भासेल. त्यासाठी नव्या तंत्रज्ञानाने युक्त अशा अद्यावत कौशल्य प्रशिक्षणासाठी विभाग सज्ज व तत्पर आहे,असे प्रतिपादन कौशल्य, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी आढावा बैठकीत केले.

जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये कौशल्य, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अंतर्गत असणाऱ्या विविध योजनांचा आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय पुरुषोत्तम देवतळे, उपायुक्त कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग श्रीमती विद्या शितोळे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी अभिजीत आलटे, उपसंचालक देवगिरी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था प्रदीप दुर्गे आदी या बैठकीस उपस्थित होते.

जनसंवाद कार्यक्रमांतर्गत मंगलप्रभात लोढा मंत्री यांनी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयातील इमारत, अभ्यासक्रम, अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबी, विकास विषयक निधीचे विविध विषय, नवीन अभ्यासक्रमाची रचना,मागणी आणि त्या संदर्भात असलेल्या विविध सूचनांचा आढावा या कार्यक्रमांतर्गत घेतला. कौशल्य विकास व तंत्र शिक्षण विभागाअंतर्गत असणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती, सेवा विषयक बाबी, विनंती बदल्या या संदर्भातही येथे अधिकाऱ्याने जनसंवाद कार्यक्रमात आपल्या सूचना मांडल्या. यावर मंत्री लोढा यांनी संबंधित विषयाचे प्रस्ताव, मागणीपत्र व सेवा विषयक बाबी असणाऱ्या गोष्टीचे कागदपत्र सादर करण्याचे निर्देश या कार्यक्रमात दिले.

यामध्ये मनोज वाघमारे ,तृप्ती भोपे, प्रशांत जोगदंड ,प्रशांत पाटील, शेख सोहेल ,अभिजीत कावले यांनी आपल्या विविध मागण्या जनसंवाद कार्यक्रमात मांडले. यावर शासकीय आणि प्रशासकीय बाबींचा विचार करून योग्य तो तोडगा काढण्याचा व उपाययोजनात्मक निर्णय देण्याबाबत मंत्री लोढा यांनी ग्वाही दिली. पंडित दीनदयाल उपाध्याय हीरक महोत्सव समितीची बैठक

जिल्ह्यामध्ये पंडित दीनदयाल उपाध्याय हीरक महोत्सव वर्षानिमित्त जिल्हा समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन शाळा महाविद्यालय, तंत्रनिकेतन कौशल्य विकास संस्था, सामाजिक संस्था, बचत गट यांच्या माध्यमातून केले जाणार आहे. यामध्ये प्रशिक्षण, लघुपट निर्मिती, वादविवाद स्पर्धा, शेतकऱ्यांपर्यंत नवीन तंत्रज्ञान व रोजगाराच्या संधी पोहोचवणे व पंडीत दीनदयाल उपाध्याय यांचा एकात्म मानवता ही संकल्पना पोहोचवून विकास कार्यामध्ये किमान 35 टक्के लोकांचा सहभाग घेतला जाणार आहे. गावागावांमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी पंडित दीनदयाल उपाध्याय हीरक महोत्सव समितीच्या माध्यमातून कार्य होईल असे मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले.

केंद्र शासन, राज्य शासन व जिल्हा नियोजन समितीच्या अंतर्गत निधीचे योग्य नियोजन करावे. तसेच शासनाने उपलब्ध करून दिलेल्या निधीचा उपयोग करून जिल्हात रोजगार निर्मितीला चालना द्यावी. त्यासाठी राबवावयाचे उपक्रम डिसेंबर अखेर पूर्ण करावे, असे निर्देश मंत्री लोढा यांनी दिले. या बैठकीत वर्षभरात रोजगार मेळावे आयोजीत करावे.एका तालुक्यात किमान दोन रोजगार मेळावे आणि औद्योगिक क्षेत्रांमध्ये एक रोजगार मेळावा व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजीत करावा असे निर्देश मंत्री लोढा यांनी यावेळी दिले.

जिल्ह्यातील सर्व तालुक्यात असलेल्या विविध शासकीय तंत्रनिकेतन अंतर्गत असलेल्या तालुकास्तरीय संस्था व्यवस्थापन समितीचा आढावा श्री. लोढा यांच्या अध्यक्षतेत घेण्यात आला. संस्था समितीच्या सदस्यांनी किमान एखादा तरी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवावा. शासकीय तंत्रनिकेतन मध्ये शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार, समन्वय, पायाभूत सुविधांची उपलब्धता करावी. विद्यार्थ्यांना विविध विषयावरील मार्गदर्शन,कौशल्य विकासाच्या अनुषंगाने असणाऱ्या नवीन अभ्यासक्रमाचे नियोजन करावे. उद्योगांसाठी मनुष्यबळ उपलब्धतेसाठी शासकीय तंत्रनिकेतन, कौशल्यविकास व उद्योजकता विभाग, विविध शासकीय विभाग यांच्याशी समन्वय ठेवावा. कौशल्यपूर्ण अभ्यासक्रमाच्या माध्यमातून जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या संस्थांमध्येही समन्वय ठेवावा असे निर्देश मंत्री लोढा यांनी दिले.यावेळी जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील शासकीय तंत्रनिकेतन विद्यालय व महाविद्यालयाच्या अंतर्गत कार्यरत असणाऱ्या संस्था व्यवस्थापन समिती सदस्य उपस्थित होते.

## पुणे स्टेशनच्या नामकरणावरून वाद



**पुणे** रेल्वे स्टेशनला बाजीराव पेशवे यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी भाजप खासदार मेधा कुलकर्णी यांनी केली आहे. परंतु याप्रकरणी राजकारण सुरु होऊन शिवसेना उबाठा पक्षाने आक्षेपार्ह पोस्टरबाजी पुणे शहरात केली. याबाबत डेक्कन पोलिस ठाण्यात गुन्हा देखील दाखल झाला आहे. याप्रकरणी खा.कुलकर्णी पत्रकारांशी शुक्रवारी संवाद साधताना माझ्या नावाने जे वादग्रस्त पोस्टर लावले गेले त्यामुळे मला खुप वाईट वाटले असे सांगत त्यांना अश्रु अनावर झाल्याचा प्रकार घडला आहे.

खा.कुलकर्णी म्हणाल्या, लोकशाही मध्ये मला माझ मत मांडण्याचा अधिकार असून मी माझे मत मांडले. पुणे स्टेशनला सगळी वेगवेगळी नावे देऊ शकतात , तशी मागणी देखील दुसरे करु शकतात. बाजीराव पेशवे भूषणावह नाव असल्याने ते नाव द्यावे असे मत मी मांडले. अशाप्रकारे कोणीही मत मांडू शकते, टीका देखील होऊ शकते. पण मस्तानीचे नाव बुधवार पेठेला द्या म्हणता म्हणजे आता आंतरजातीय विवाहाला विरोध आहे का? आम्ही नाव द्या म्हटले , निर्णय घेणारे वेगळे लोक आहे. टिका करताना काही पातळी असावी. मी जगभरात संसदेच्या शिष्टमंडळात जाताना साडी नेसून गेले परंतु माझ्याबाबत वेगळया पध्दतीचे पोस्टर लावले गेले याचे खूप वाईट वाटते. अश्लील मेसेज त्यावर टाकले गेले हे चुकीचे आहे. काळ सोकावू नये म्हणून जे दोषी त्यांना शिक्षा झाली पाहिजे. महिला राजकारणी यांच्याबाबत तारतम्य बाळगून टिका झाली पाहिजे.

खा.मेधा कुलकर्णी यांनी पुणे मनपा आयुक्त नवलकिशोर राम यांची शुक्रवारी भेट घेतली. पुण्यातील विविध विकासकामे व अडचणीबाबत त्यांच्याशी चर्चा केली. पुण्यात परवानगी नसताना अनेक ठिकाणी बेकायदेशीर कामे सुरु असून त्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. पुण्यातील कल्याणीनगर, कोरेगावपार्क परिसरात निवासी इमारतीत टेरेसवर बेकायदेशीर पब, रुफ टॉप हॉटेल सुरु असून त्यावर मनपाने कारवाई करण्याची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.





